Publication: Sakal

Headline: Move gold market to a different location

Edition: All Editions

Date: 15th July, 2011

Coverage

सराफ बाजार स्थलांतरित करा

'बॉम्बे बुलियन असोसिएशन'चे अध्यक्ष पृथ्वीराज कोठारी यांची मागणी

वैभव वझे / सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १४ : शहरातील सराफ बाजार हे दहशतवाद्यांचे आवडते टार्गेट आहे, हे आता पुरेसे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे हा बाजार अन्यत्र हलवावा, अशी मागणी 'बॉम्बे बुलियन असोसिएशन'चे अध्यक्ष पृथ्वीराज कोठारी यांनी केली आहे. मुंबईतील सर्व सराफ संघटनांची उद्या (ता. १५) राज्य सरकारसमवेत बैठक होणार असून, त्यात ही मागणी ठेवली जाईल, असे कोठारी यांनी 'सकाळ'ला सांगितले. या वेळी गृहमंत्र्यांची भेटही घेतली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

झवेरी बाजार, दादर कबूतरखाना व ओपेरा हाउस या तीन ठिकाणी बुधवारी (ता. १३) बॉम्बस्फोट झाले. यापूर्वीही दहशतवाद्यांनी झवेरी बाजार परिसराला लक्ष्य केले होते याची आठवण करून देत पृथ्वीराज कोठारी म्हणाले, "याआधी घानजी स्ट्रीट व झवेरी बाजारात स्फोट झाले आहेत. या वेळेस दहशतवाद्यांनी झवेरी बाजार परिसरातील खाऊ गल्लीला लक्ष्य केले; परंतु खाऊ गल्लीमध्ये ज्वेलर नसल्यामुळे मोठे नुकसान टळले आहे. केवळ दहशतवादी हल्ला झाला म्हणून सराफा बाजार स्थलांतरित करण्याची मागणी आपण करणार नसल्याचे कोठारी यांनी स्पष्ट करतानाच यासाठी अन्य कारणेही त्यांनी सांगितली. ते म्हणाले, "सराफा बाजारात एकेका खोलीत ४०-४० कारागीर दाटीवाटीने बसून दागिने घडवितात. या खोल्यांचा आकाराही लहान आहे.

त्यामुळे गॅस सिलिंडरचा स्फोट झाला तरी १००-२०० माणसे मरू शकतात. या कारणांमुळेही सराफा बाजार मोठ्या जागेत हलविणे गरजेचे आहे. हिरे व्यापाऱ्यांना सरकारने वांद्रे-कुर्ला संकुलात जागा देऊ केली असून, तेथून व्यापाराला सुरुवातही झाली आहे; मात्र अशी स्वतंत्र जागा सोने-चांदी व्यापारासाठीही अशा बॉम्बस्फोटांच्या पार्श्वभूमीवर तातडीने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ज्वेलर्स सध्या भयभीत झाल्याचे कोठारी यांनी सांगितले.

'बॉम्बे बुलियन असोसिएशन'चा बॉम्बस्फोटानंतरचा परिसर

झवेरी बाजाराला कोणतीही सुरक्षा पुरवलेली नाही. हे असेच सुरू राहिल्यास सर्वसामान्य माणूस झवेरी बाजारात पाऊल टाकताना विचार करेल. अशा घटनांमुळे झवेरी बाजारातील व्यापारावर परिणाम होतो आणि सरकारचा महसूल बुडतो.

- पृथ्वीराज कोठारी, अध्यक्ष, बॉम्बे बुलियन असोसिएशन

झवेरी बाजार आजही बंद राहणार

झवेरी बाजार परिसरातील बॉम्बस्फोटाचा निषेध म्हणून जवाहिऱ्यांनी आपापली दुकाने आज (ता. १४)बंद ठेवली होती. गुरुवारीही ही दुकाने बंद ठेवली जाणार आहेत. झवेरी बाजार परिसरातील सोने-चांदीच्या व्यापाराप्रमाणेच ओपेरा हाऊस येथील 'पंचरत्न' इमारतीतून कोटयवधींचा हिरे व्यापार होतो. देशातील जवळपास प्रत्येक हिरे व्यापाऱ्याचे कार्यालय या इमारतीत आहे. ओपेरा हाऊस परिसरात बॉम्बस्फोट झाल्यामुळे संपूर्ण हिरे उद्योगावरच हा हल्ला झाला असल्याची भावना अनेक हिरे व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

सीसीटीव्ही फुटेजवरून सुगावा?

झवेरी बाजारातील अग्यारी दुसरी गल्ली येथे दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. त्यातील फुटेजच्या आधारे स्फोटाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले.